## लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ



**मुंबई** : महायुती सरकारने राज्यभरातील महिलांना दिलासा देत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी आता लाभार्थी महिलांना १५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यामुळे ज्या महिलांनी अद्याप या योजनेसाठी अर्ज दाखल केले नाहीत त्यांना अर्ज दाखल करण्यासाठी आणखी एक संधी मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अजूनही अर्ज न करू शकलेल्या महिलांसाठी सरकारने आणखी चार दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. १५ ऑक्टोबर रोजी रात्री १२पर्यंत महिलांना या योजनेसाठी अर्ज करता येणार आहेत, मात्र हे अर्ज अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातूनच दाखल करावेत, अशी सूचना शासनाकडून प्राप्त झाली आहे.

रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ८६
www.ramprahar.com

शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### अंतरंग

एक्स्प्रेस वेवर ट्रक कलंडला; वाहतूक काही काळ बंद/२

जंजिरा किल्ल्याच्या जेट्टीचे काम पूर्ण होण्याची प्रतीक्षा/५

खालापूरची पाणी समस्या दूर होणार; योजनेचे भूमिपूजन/७

# नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची यशस्वी चाचणी

## लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव विमानतळाला देणार -मुख्यमंत्री





**पनवेल : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भूमिपुत्रांचे नेते दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ११) दिली. या विमानतळाच्या धावपट्टीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वी चाचणी झाली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते.

पनवेलजवळील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आता जवळपास अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी धावपट्टीची शुक्रवारी चाचणी करण्यात आली. वायुदलाचे सी-२९५ हे विमान धावपट्टीवर यशस्वीपणे उतरविण्यात आले. या विमानावर पाण्याचा फवारा मारत अनोखी सलामी देण्यात आली. याबरोबरच लढाऊ सुखोई ३० विमानानेही यशस्वी फ्लायपास केला. लँडींग करणाऱ्या सी-२९५ विमानाच्या वैमानिकाचा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या चाचणीस केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, अपर मुख्य सचिव गृह इकबाल चहल, लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे दशरथ पाटील, जे.डी. तांडेल, विनोद म्हात्रे, दीपक पाटील, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल, नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त कैलास शिंदे, उपायुक्त राहुल गेठे, पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, विभागीय आयुक्त डॉ. देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सी-२९५ विमान हे गांधीनगरहून, तर सुखोई हे पुण्यातून आले होते.

या वेळी माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असे नमूद करून या यशस्वी चाचणीचे महत्त्व अधोरेखित केले. विमानतळाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. विजयादशमीच्या एक दिवस आधी झालेल्या या कार्यक्रमामुळे सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांसाठी मोठा आनंद आहे. मार्च २०२५मध्ये हे विमानतळ नियमित प्रवासी सेवेसाठी सुरू होईल. वेळेआधीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगून सिडकोने केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल सर्व टीमचे अभिनंदन केले.

पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, आमचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील जनतेचे नेतृत्व फायटरप्रमाणे करतात. एकही मोदी सबस पे भारी हे आपण हरियाणामध्ये आणि लोकसभेतही पाहिले. ते देशातील जनतेला सोबत घेऊन नेतृत्व करतात. आमचे महायुतीचे डबल इंजिनचे सरकार असल्याने काय फायदे होतात हे आज राज्यातील जनतेला कळले आहे. केंद्र सरकार आणि हवाई दलाकडून लागणाऱ्या परवानग्या आम्हाला मिळाल्या, म्हणून आजचा दिवस उजाडला आहे.

हे विमानतळ सर्वसामान्यांसाठी मोठे आश्रयस्थान बनेल तसेच यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला आणखी वेग येईल, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, या विमानतळामुळे हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील तसेच इथे आयटी पार्क आणि व्यावसायिक केंद्र उभारली जातील तसेच या विमानतळाला भूमिपुत्रांचे नेते स्व. दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्यांचेच नाव विमानतळाला देण्यात येईल, असे स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आम्ही मागच्या काळात सुरू केले होते. आज त्याच्यावर टेस्ट लँडींग यशस्वीरीत्या झालेले आहे. हे काम आम्ही सुरू केले तेव्हा विरोधकांनी आमच्यावर टीका केली होती की, अशा प्रकारच्या घोषणा खूप होतात. त्यामुळे हे विमानतळ होणार नाही, पण आज याच्यावर टेस्ट लँडींग झाले असून त्याचा पहिला टप्पा पूर्ण होत लवकरच्या कमर्शियल विमानासाठी हे विमानतळ खुले होईल.

### विकासाला चालना मिळणार -उपमुख्यमंत्री फडणवीस

नवी मुंबई विमानतळाचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या विमानतळावरुन दरवर्षी अंदाजे नऊ कोटी प्रवासी प्रवास करतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला. हे विमानतळ शिवडी-न्हावाशेवा सी लिंक मुंबई तसेच नवी मुंबई मेट्रो, दोन खाडीमार्गाने जोडले जात असून तो देशातील एक विशेष प्रकल्प ठरणार आहे. यामुळे विकासाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

## पुणे बलात्कार प्रकरणातील नराधमांच्या मुसक्या आवळल्या

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्याच्या बोपदेव घाटात तरुणीवर झालेल्या सामूहिक बलात्कारप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक, तर दोघांना नागपूर येथून ताब्यात घेतले आहे. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली.

पुणे शहरात नव्याने सुरू करण्यात आलेल्या सात पोलीस ठाण्यांचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. बोपदेव घाट परिसरात ३ ऑक्टोबरला रात्री मित्राबरोबर फिरायला आलेल्या महाविद्यालयीन तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. कोणतेही धागेदोरे हाती नसताना पोलिसांनी आरोपींना पकडले. याबद्दल फडणवीस यांनी कौतुक केले.

## इर्शाळवाडी दरडग्रस्तांना नवीन घराच्या चाव्या सुपूर्द



**चौक : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ११) नवी मुंबईतील कार्यक्रमात खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दरडग्रस्तांना नवीन घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या. त्यामुळे येथील आदिवासी बंधू-भगिनी दसऱ्याच्या पूर्वसंध्येला नव्या आणि सुसज्ज घरात राहावयास गेले आहेत.

या कार्यक्रमास सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाठ, खासदार नरेश म्हस्के, आमदार गणेश नाईक, चौक ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू ठोंबरे, ग्रामपंचायत अधिकारी शंकर राठोड यांच्यासह पदाधिकारी, शासकीय अधिकारी उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांना पोटदुखी

### आमदार प्रशांत ठाकूर यांचा हल्लाबोल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला भगिनी आपल्या कुटुंबासाठी आयुष्यभर झटत असतात. या बहिणींना ताकद देण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली, मात्र ही योजना सुरू झाल्याने विरोधकांच्या पोटात दुखायला लागले आहे. ते ही योजना बंद करण्यासाठी कोर्टात गेले. तरीही ही योजना बंद होणार नाही, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठणकावून सांगितले.

महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांकडून सरकारच्या या योजनेचे स्वागत केले जात आहे. याच महिलांचे आशीर्वाद घेण्यासाठी पनवेलमधील सर्व महिला भगिनींसाठी खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून गुरुवारी (दि. १०) बेलवलीमध्ये हा कार्यक्रम झाला. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला महिलांनी मोठी गर्दी केली होती.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भष्टाचारी शेकापवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, तीन वर्ष झाली माजी आमदार विवेक पाटील हे कर्नाळा बँकेत घोटाळा केल्याने जेलमध्ये आहे. लोकांचे पैसे खाऊन जे तुरूंगात आहेत त्यांच्याच पक्षाने लोक येऊन सांगतात लाडकी बहीण योजना बंद होईल. त्यामुळे खोटं पसरवणारे कोण आहेत हे नीट पाहून घ्या. **(पान २ वर..)**

## अभिनेते सयाजी शिंदे राष्ट्रवादीत

**मुंबई : प्रतिनिधी**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी गाजवलेले ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ११) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. पक्षप्रवेशासोबतच त्यांना विधानसभा निवडणुकीसाठी स्टार प्रचारक करण्यात आले.

सयाजी शिंदे यांनी अभिनय क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रातही भरीव कामगिरी केली असून त्यांच्या पक्षप्रवेशाने राष्ट्रवादीला बळ मिळेल, असा विश्वास राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.






# सर्वोत्तम तंत्रज्ञानाने महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प सज्ज -उपमुख्यमंत्री फडणवीस

**ठाणे : प्रतिनिधी**

सर्वोत्तम तंत्रज्ञानाने सज्ज असा हा महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प जनतेमधील सायबर अटॅकची भीती निश्चितच कमी करेल. हा प्रोजेक्ट जनतेची डिजिटल माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीचे प्रमाण कमी करण्यात, त्यांना दिलासा देण्यात नक्कीच यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.११) महापे येथे व्यक्त केला.



नवी मुंबईतील महापे औद्योगिक वसाहत येथील मिलेनियम बिझनेस पार्क या ठिकाणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी आमदार रमेश पाटील, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) इकबाल चहल, अपर पोलीस महानिरीक्षक अर्चना त्यागी, विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर), यशस्वी यादव, पोलीस महानिरीक्षक (आर्थिक गुन्हे) बिपिन कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेशसिंह,पोलीस उपमहानिरीक्षक, सायबर संजय शिंत्रे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक पी. वेलरासू, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे, गृहविभागाचे सहसचिव राहुल कुलकर्णी, वास्तूरचनाकार सलोनी देवधर, सपना कोळी, सायबर सुरक्षा प्रकल्पाचे व्यवस्थापक ननवनाथ देवगुडे आदी उपस्थित होते.

सायबर सिक्युरिटी प्रोजेक्ट हा सर्वांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. हा महाराष्ट्र राज्यासाठी एक आयकॉनिक प्रोजेक्ट आहे. अपेक्षेपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे हा प्रकल्प पूर्ण झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. हे सेंटर देशातील सर्वात आधुनिक सायबर सिक्युरिटी सेंटर झाले आहे. व्हॉट्सअॅप, फेसबुकच्या माध्यमातून खोट्या मेसेजच्या आधारे लोकांची फसवणूक होत होती, होत आहे. यावर शासनाने गांभीर्याने विचार करून अशा प्रकारचे आधुनिक सायबर सिक्युरिटी सेंटर सुरू करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. हा केवळ प्रकल्प न राहता कॉर्पोरेशन व्हावे, इतर राज्यांनाही या माध्यमातून सायबर सिक्युरिटी बाबतचे मार्गदर्शन केले जावे, खासगी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान तज्ज्ञांशीही आपला समन्वय वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी या माध्यमातून जनतेला सायबर सिक्युरिटी उत्तम प्रकारे देण्यात आपण यशस्वी होऊ, असा विश्वास व्यक्त केला.


१४४०७ हा हेल्पलाईन नंबर आजपासून कार्यान्वित होणार असून १५ ऑक्टोबरपासून या केंद्रातील सर्व सेवा पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाच्या संकेतस्थळाचेही उद्घाटन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

# कळंबोली सेक्टर १४मध्ये नवीन वीजवाहिनी आणि पिलर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार विजेच्या लपंडावावर महावितरणचा उपाय!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही महिन्यांपासून कळंबोली सेक्टर १४ येथे विजेचा लपंडाव सुरू होता. जुनाट आणि कमी क्षमतेची केबल, त्याचबरोबर वाढलेला लोड यामुळे ही समस्या उद्भवली होती. याबाबत स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष घातल्याने या परिसरामध्ये नव्याने वीजवाहिनी टाकून पिलरसुद्धा बसवण्यात आला आहे. त्यामुळे आता हजारो वीज ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा केला जाणार आहे. म्हणून येथील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.



कळंबोली से. १४ येथे बीयुडीपीची घरे आहेत. या ठिकाणी अल्प आणि मध्यमवर्गीय लोक वास्तव्यास आहेत. दरम्यान, नियमित वीज बिल भरणा केला जात असतानाही या ठिकाणचा वीजपुरवठा सातत्याने खंडित होत होता. केबल फॉल्ट होणे, त्याचबरोबर स्पार्क आणि ट्रान्सफार्मामध्ये बिघाड या कारणाने रात्रीच्या वेळी तासन्‌तास बत्तीगुल होत होती. त्यातच नवरात्रोत्सव सुरू असून पहिल्या आणि तिसऱ्या माळेला पूर्णपणे अंधार झाला होता. परिणामी भाविकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला.

या परिसरात अखंडीत वीजपुरवठा व्हावा यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठक घेतली होती तसेच या संदर्भात त्वरित उपाययोजना करण्यात यावी, असे सूचित केले होते. सेक्टर १४ येथील वीज प्रश्नावर कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांनी महावितरण कंपनीला पत्र दिले होते. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांनीसुद्धा वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. दरम्यान, यामध्ये कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि कळंबोलीचे सहाय्यक अभियंता यांनी स्वतः गांभीर्याने लक्ष घालून सेक्टर १४ येथील वीजवाहिनी बदलली आहे. अगोदर या ठिकाणी ७० केव्हीची केबल होती. एकूण विजेची मागणी पाहता त्याची क्षमता कमी असल्याने हा प्रश्न निर्माण होत असल्याचे सहाय्यक अभियंत्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करून ३०० केव्ही क्षमतेची वीजवाहिनी या ठिकाणी नव्याने टाकली. जवळपास दीडशे मीटर लांबीची केबल बदलण्यात आली. या कामाची राजेंद्र शर्मा यांनी स्वतः स्थळ पाहणी केली.

आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे वीज वितरण कंपनीने या ठिकाणी उपाययोजना केल्या. आता या भागातील वीज ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा होईल, असा विश्वास महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक ७मधील कळंबोली सेक्टर १४ येथे विजेचा लपंडाव सुरू होता. येथील रहिवाशांच्या तक्रारी असल्याने आम्ही सातत्याने महावितरणकडे पाठपुरावा करत होतो. याबाबतीत स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष घातले. पक्षाचे शहराध्यक्ष रविनाथ पाटील आणि मी संबंधित कार्यालय आणि अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. शेवटी या ठिकाणची केबल बदलण्यात आली असून त्याची क्षमता दुपटीपेक्षा जास्त वाढवण्यात आली आहे. त्यामुळे केबल फॉल्ट होऊन वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल आणि बत्ती गुल होण्याची समस्या जवळपास मार्गी निघेल.**

**–राजेंद्र शर्मा, माजी नगरसेवक, भाजप**

# मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर ट्रक कलंडला; वाहतूक काही काळ बंद





**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे जुन्या महामार्गावरून ट्रक खंडाळावरून मुंबईच्या दिशेने माल घेऊन जात असताना शुक्रवारी (दि.११) सायंकाळी ६ वा. सुमारास तो खंडाळा घाटातील बॅटरी हिलजवळ ब्रिजवरून खाली कलंडला.

यामुळे ट्रकमध्ये असलेला स्क्रॅप माल एक्सप्रेस वेवर पडल्याने मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर काही काळ वाहतूक कोंडी झाली. सलग दोन दिवसांची सुटी असल्याने एक्स्प्रेस वेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे. त्यातच हा अपघात झाल्याने भीषण पुणे लेनवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली.

# आरसीएफच्या महाप्रकल्पामुळे रोजगार मिळणार

## आमदार महेंद्र दळवी यांची ग्वाही

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात आरसीएफ कंपनीचा प्रकल्प मंजूर झाला असून हजारो बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळणार आहे. विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता ग्रामीण जनतेने प्रकल्पाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

तालुक्यातील तळेखार ग्रामपंचायत येथील मरीआई मंदिराचे प्रांगणात आयोजित संवाद मेळाव्यास मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी तळेखार सरपंच विजय घाणेकर, जिल्हा संघटक दिनेश मिनमिणे, तालुका संघटक यशवंत पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, उपतालुकाप्रमुख भगिरथ पाटील, विघ्नेश माळी, युवा नेते दिपेश वरणकर, माजी पं. स. सभापती चंद्रकांत, उपसरपंच निलेश तांबडकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवसेनेचे कार्यकर्ते विघ्नेश माळी यांनी, ग्रामपंचायत तळेखार येथे झालेल्या विकासकामांचा आढावा घेतला, तसेच ग्रुप ग्रामपंचायत तळेखार येथे मंजूर झालेल्या विकासकामांचीही माहिती दिली. प्रस्तावित कामांमध्ये तळेखार मेन रोड ते शिवगाव रस्ता, तळेखार मेन रोड ते मरीआई मंदिर रस्ता, तळेखार तळे अंतर्गत रस्ता, बौद्धवाडी येथे समाजमंदिर, तळेखार येथे मुस्लिम समाजमंदिर सभागृह, तळेखार तळे येथे सामाजिक सभागृह तसेच बौद्धवाडी रोहिदासवाडी येथून मेन रोडपर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकणे आदी कामे लवकरच पूर्ण होतील याची ग्वाही दिली.

# पनवेल रेल्वेस्थानकात रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व जे. जे. हॉस्पिटल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल रेल्वेस्टेशन येथे रक्तदान शिबिर तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिरात एनएसएस स्वयंसेवकांमार्फत प्रवाशांमध्ये रक्तदानासाठी जागरूकता करण्यात आली व प्रवाशांना रक्तदान करण्यास प्रोत्साहन करण्यात आले, तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये डोळे तपासणी, रक्तदाब तपासणी, स्नायू तपासणी यासारख्या मोफत तपासणींचा प्रवाशांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

जे. जे. हॉस्पिटल रक्तबँकचे समन्वयक ज्ञानेश्वर कदम यांच्या देखरेखीखाली व स्वयंसेवकांच्या सहकार्याने शिबिरामध्ये एकूण १०१ दात्यांनी रक्तदान केले. त्याचबरोबर शिबिरामध्ये एनएसएस स्वयंसेवकांबरोबरच रोट्रॅक्ट क्लब ऑफ सीकेटीचे मेंबर्स स्वयंसेवेसाठी सहभागी होते.

या कार्याबद्दल स्वयंसेवक सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सूर्यकांत परकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपेश माने यांनी शिबिर यशस्वीरित्या पार पाडण्यास भूमिका बजावली. शिबिर यशस्वी केल्याबद्दल जे. जे. हॉस्पिटल भायखळा यांच्याकडून राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाविद्यालयाला प्रशस्तीपत्र देण्यात आले.

# गव्हाण विद्यालयात ‘ॲनिमिया’वर चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये ॲनिमिया – लक्षणे, कारणे व प्रतिबंधक उपाय यावर चर्चासत्र झाले.

ज्येष्ठ विज्ञान शिक्षिका चित्रलेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये बऱ्याच अंशी अशक्तपणा, चक्कर येणे हे सर्व लोहाच्या कमतरतेमुळे जाणवणारे आणि ॲनिमिया बळावण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी पालेभाज्या, फळभाज्या, प्रथिनयुक्त कडधान्ये आदींचे आहारात संतुलीत प्रमाण राखणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी फास्ट फूड अथवा जंक फूडचा वापर पूर्णपणे टाळून घरून आईने दिलेल्या डब्यातील अन्नपदार्थांचे सेवन करण्याची सवय लावून घ्यावी, असा सल्ला त्यांनी दिला.

या वेळी विद्यालयाच्या आरोग्य विभागाचे प्रमुख ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, कलाशिक्षक गणेश भोईर, ज्येष्ठ शिक्षिका यु.ए.म्हात्रे, सुजाता शेलार, अस्मिता वर्तक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे व उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन शिक्षक सागर रंधवे यांनी केले.




# सीकेटी कॉलेजमध्ये मानसिक आरोग्य दिनानिमित्त कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे समुपदेशन कक्ष विभागातर्फे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त माहितीवर कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि.१०) आयोजन करण्यात आले होते.

आर्टस् विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, अर्थशास्त्र विभागाचे प्रा.के.एन. ढवळे, राज्यशास्त्र विभागाचे प्रा. आकाश पाटील, लेखा आणि वित्त विभागाचे प्रा. अनिकेत सोनसुरकर यांची कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थिती लाभली.

कार्यक्रम कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. मानसिक आरोग्य दिनाचे ब्रीदवाक्य कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य हे होते. समुपदेशक स्वाती परब व त्यांचे सहकाऱ्यांनी मानसिक आरोग्याचे कामाच्या ठिकाणी असलेले महत्त्व पटवून देत परिवर्तन संस्थेने तयार केलेल्या मेंटल हेल्थ सपोर्टिव्ह ॲपबद्दल माहिती दिली.

डॉ. बी.एस.पाटील यांनी उत्तम प्रकारे जीवनामध्ये एकमेकां साह्य करणे हे कसे महत्त्वाचे आहे ते सांगितले. सर्व विद्यार्थ्यांनी उत्तमप्रकारे सहभाग घेऊन आपल्या मनातल्या शंका विचारल्या. सुमारे १२२ विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी समुपदेशन कक्ष विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या सहाय्याने प्रयत्न घेतले.

**दुखवटा**

## रमेशचंद्र शाह



**मोहोपाडा** : वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीचे पहिले सरपंच रमेशचंद्र लिलाचंद शाह यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. मोहोपाड्यात विकास गंगा आणण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या मृत्यू झाल्याचे समजताच मोठ्या संख्येने जनसमुदाय एकवटला. मोहोपाडा गणपती मंदिराच्या सभागृहात मंगळवारी (दि.१५) दुपारी ३ ते ५ या वेळात प्रार्थनासभेचे आयोजन करण्यात आले असल्याचे अमूळ शाह, समूळ शाह यांनी सांगितले.

पान १ वरुन

## लाडकी बहीण योजनेमुळे विरोधकांना पोटदुखी

देशातील सरकार हे महिलांसाठी विविध योजना आणत आहेत, तर राज्यामध्ये महायुतीचे सरकारही महिलांच्या हितासाठी काम करत आहे. या सर्व कल्याणकारी योजना सुरू राहण्यासाठी राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत यायला पाहिजे. यासाठी तुमचा आशीर्वाद महायुती सरकारच्या पाठिशी राहूद्या, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, अमरीश मोकल, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, जिल्हा चिटणीस भूपेंद्र पाटील, युवा नेते योगेश लहाने, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष कमला देशेकर, सरचिटणीस प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य योगिता भगत, उपाध्यक्ष समिना साठी, कोषाध्यक्ष ज्योती भोपी, मनिषा बहिरा, माजी नगरसेविका निता माळी, पल्लवी पाटील, मित्तल पाटील, बेलवलीच्या उपसरपंच अप्रिता पवार, सदस्य सविता पाटील, रेश्मा माळी, पूजा पाटील, निता मंजुळे, शिल्पा पवार, संगीता भुतांबरा, सतिश पाटील, अप्पा भागीत, जितेंद्र बताले, संतोष पाटील, नारायण म्हात्रे, अनंता पवार, नासीर शेख, राम भवर, भालचंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीकाळभैरवनाथ देवस्थानची सोने लुटण्याची अनोखी परंपरा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

ग्रामदैवत श्रीकाळभैरवानाथ जोगेश्वरी, रवळनाथ, काळकाई व मरीआई पंचायतनाचा नवरात्रोत्सव शुक्रवारी (दि.११) सायंकाळपपर्यंत विविध व्याख्याने व भजनांच्या कार्यक्रमांनी साजरा झाला. पोलादपूरच्या देवस्थानात सोनेपूजन कार्यक्रम झाल्यानंतर शनिवारी (दि.१२) सायंकाळी सर्व नगरांतील ग्रामस्थांचे सिमोल्लंघन पोलादपूर पोलीस ठाण्यापर्यंत होऊन पोलीस ठाण्याबाहेर सोने लुटण्याची अनोखी परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे.

दसऱ्याच्या दिवशी नवरात्रौत्थपनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सायंकाळी ४ वाजता सोनेपूजनाची परंपरा देवस्थानात होणार आहे. यानंतर पोलादपूर पोलीस ठाण्याच्या प्रांगणात सोनलुटण्याची आणि सिमोल्लंघनाची अनोखी परंपरा साजरा होणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष बाबूराव महाडीक यांनी दिली.



# ‘कर्नाळा’ घोटाळ्यातील पैसे भाजपमुळे परत मिळाले -आमदार प्रशांत ठाकूर

## आकुर्ली येथे खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रम







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळ बँकेचा घोटाळा करून गरिबांचे पैसे विविक पाटलांनी खाल्ले म्हणून ते तुरुगांत शिक्षा भोगत आहे, पण तरीही शेकापचे कार्यकर्ते त्यांचे बॅनर झळकावत आहेत. कर्नाळा बँकेच्या घोटाळ्यातील पाच लाखांपर्यंचे पैसे हे भाजपच्या पदाधिकाऱ्यांमुळेच परत मिळाले असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आकुर्ली येथे केले.

महिला सक्षमीकरणासाठी केंद्रातील मोदी सरकार हे विविध कल्याणकारी योजना सक्षमपणे राबवत आहे. त्यानुसार राज्यातील महायुती सरकारनेदेखील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. ही योजना सुरू करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोलाची भूमिका बजावली. यासाठी त्यांचे आभार मानण्याच्या दृष्टीकोनातून लाडक्या बहिणींचा देवाभाऊ या कार्यक्रमांतर्गत खेळ पैठणीचा आणि लकी ड्रॉ कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. आकुर्ली येथील काकाजिनी वाडीमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि.१०) करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला महिला भगिनींचा चांगला प्रतिसाद लाभला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, जि. प. माजी सदस्य अमित जाधव, सरचिटणीस भुपेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, चिटणीस अमरीश मोकल, युवा नेते दशरथ म्हात्रे, महिला मोर्चा अध्यक्ष कमला देशेकर, ॲड. वृषाली वाघमारे, अनिता पाटील, सरपंच योगीता पाटील, प्राची जाधव, सपना पाटील, पुष्पा म्हस्कर, ज्योती भोपी, शिल्पा म्हात्रे, ललिता भोईर, सविता उलवेकर, प्रतिभा भोईर, समिना साठी, भारती पाटील, संजना पाटील, विश्वजीत पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला उपस्थित होत्या.



**तळोजा : फेज १ येथे भाजप व गौरा गणपती महिला मंडळ यांच्या वतीने तळोजा पोलीस ठाण्यामधील सर्व महिला अधिकाऱ्यांचा नवदुर्गा सन्मान करण्यात आला. या वेळी आयोजक प्रल्हाद केणी व निर्दोष केणी यांच्याकडून सर्व महिला अधिकाऱ्यांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.**





**पनवेल : नवतरुण मित्र मंडळ, आदिशक्ती महिला मंडळ, सखी समृद्धी महिला मंडळ व सुमित खानावकर सामाजिक विकास मंडळ नावडे आयोजित नवरात्रोत्सवाला भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा सचिव शुभ पाटील यांनी भेट देऊन दर्शन घेतले. आयोजक युवा नेते दिनेश खानावकर, विनोद खानावकर यांनी त्यांचे स्वागत केले.**

**खारघर : श्री सौराष्ट्र लेवा पाटीदार समाज मित्र मंडळ व श्री कच्छ वागड लेवा पाटीदार समाजाच्या वतीने नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या नवरात्रोत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्यासह भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, उद्योजक सेलचे उपाध्यक्ष कुणाल सांघानी, विपुल चोटलिया, अशोक जांगीड, आंबाभाई पटेल, भांजीभाई पटेल, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, आदित्य हाटगे, दीपक ठाकूर, प्रथम पाटील, वागड लेवा पाटीदार समाजाचे प्रमुख जीवाभाई रावत, सौराष्ट्र लेवा पाटीदार समाज मित्र मंडळाचे अध्यक्ष रमेश सारठीया यांच्याह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक उपस्थित होते.**











**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी मध्यामिक विद्यालयात गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी आकर्षक पेहरावात उत्साहात उपस्थित होते. उत्कृष्ट आणि लयबद्ध नृत्य करणाऱ्यांचे परीक्षण करण्यासाठी नेहा शेंडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी या दोन गटातून प्रत्येकी तीन विजेत्यांना गौरविण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाचे विद्यालयाच्या मुख्याध्यापक संतोष चव्हाण आणि पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांनी कौतुक केले.**

# विकासाची कामे जनतेपर्यंत पोहचवा -अरुणशेठ भगत

## बेलपाडामध्ये विकासकामांचे भूमिपूजन



**पनवेल** : उरण मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदींच्या प्रयत्नांमुळे विकासाची गंगा वाहत आहे. त्यामुळे ही विकासाची कामे जनतेपर्यंत पोहचवून सर्वांना एकत्रित घेऊन काम करा आणि आपली ताकद दाखवा, असे आवाहन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी बेलपाडामध्ये विकासकामांच्या भूमिपूजनाच्या वेळी केले.

या वेळी सुमारे ६० लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि.११) झाले.

उरण मतदारसंघातील बेलपाडा गावात सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांनी १० लाख रुपये स्वखर्चातून दिले आहे. या निधीमधून आंगणवाडीचे बांधकाम करण्यात येणार आहे, तसेच आमदार महेश बालदी यांच्या ५० लाख रुपयांच्या स्थानिक विकास निधीमधून बेलपाड्यात सामाजिक सभागृह उभारण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत झाले.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सदस्या योगीता भगत, भाजप नेते हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, गणेश पाटील, अरुण घरत, जयेंद्र ठाकूर, दत्ताराम कोळी, अशोक घरत, दिपक पाटील, हनुमान म्हात्रे, मधुकर म्हात्रे, निलेश म्हात्रे, धनाजी घरत, नाथाजी घरत, प्रवीण म्हात्रे, संतोष पाटील, कर्णिक पाटील, सचित म्हात्रे, रोहन कडू, निलेश म्हात्रे, विकास पाटील, किरण म्हात्रे, महेश पाटील, भूषण ठाकूर, सज्जन ठाकूर, इंदुमती पाटील, कविता म्हात्रे, निशा कोळी, रेखा कोळी, कविता कोळी, सरीता मनोरे, ग्रामस्थ उपस्थित होते.

# उरण देऊळवाडी जरीमरी आई मंदिरात हळदीकुंकू

**उरण : वार्ताहर**

शहरातील देऊळवाडी येथे सुमारे ३०० वर्षापूर्वीचे स्वयंभू जरीमरी आई मंदिर असून निखील पाटील यांचे आजोबा नारायण सहदेव पाटील यांनी २००५ साली जुन्या मंदिराच्या ठिकाणी नवीन मंदिर बांधण्यात आले. दरवर्षी याठिकाणी उत्सव साजरे केले जातात. दरवर्षाप्रमाणे यंदाही मंगळवार (दि. ८) निखील पाटील यांची पत्नी श्लोका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम ठेवण्यात आला होता.



प्रत्येक महिलेस भेटवस्तू म्हणून साडी देण्यात आली व प्रसाद देण्यात आला. कार्यक्रमास आमदार महेश बालदी यांच्या सुविद्य पत्नी निता महेश बालदी, संगीता पवार, महिला मंडळ सदस्या उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी श्लोका निखील पाटील, कल्पना समीर सुर्वे व महिलावर्ग यांचे सहकार्य मिळाले.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पालक सभा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**



येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात एसएससी परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र भरण्याची प्रक्रिया बुधवारी (दि.९) पालकांसमवेत सुरू करण्यात आली. ५४ विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरण्यासाठी विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या पालकांची सभा ही घेण्यात आली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत दहावीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका विशाखा गावंड यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत, शिस्तीबाबत, अभ्यासाबाबत तसेच आवेदन पत्र भरण्यातील बारकाव्यांबाबत सखोल माहिती दिली. विद्यालयाच्या लेखणीत भारती कोळी यांनीदेखील ऑनलाईन फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणी पालकांना समजावून सांगितल्या. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य गणेश देवकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

माता पालक संघाच्या सदस्य तृप्ती मात्रे पुष्पा शिरसाठ यांनी देखील विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रविष्ट होण्याचा संदर्भात शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत व हजेरी बाबत पालकांना माहिती देऊन सर्व विद्यार्थ्यांना एसएससी परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## दुर्गामाता दौड (माळ नववी)



**पनवेल : शारदीय नवरात्रोत्सवाच्या नवव्या दिवशी सनातन आश्रम देवद येथून शुक्रवारी प्रेरणा मंत्र घेऊन दौड सुरू करण्यात आली. पुढे मार्गक्रमण करीत संपूर्ण देवदमध्ये दौड गेली. नंतर गावदेवीच्या मंदिरात येऊन देवीची आरती, श्लोक व गोंधळ घेण्यात आला. पुन्हा सनातन आश्रमामध्ये येऊन ध्येयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली. दुसरी दौड ही ओवळे गावात घेण्यात आली. संपूर्ण गावात दौड फिरून गावदेवीच्या मंदिरात आली. तेथेही आरती, श्लोक व धेयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली.**

## संपादकीय

# भ्रमाचा भोपळा फुटला

लोकसभा निकालानंतर फुगलेला काँग्रेसचा भ्रमाचा भोपळा हरियाणातील पराभवाने फुटला आहे. महाराष्ट्रात महायुतीचा पराभव होईल असे छातीठोकपणे सांगणारे महाविकास आघाडीचे नेते आता गांगरून गेलेले दिसत आहेत. काँग्रेसच्या हरियाणातील पराभवाचा तेथील सत्ताधारी भाजपला झाला नसेल इतका आनंद महाराष्ट्रातील महाविकास आघाडीतील त्यांच्या सहयोगी पक्षांना झालेला दिसतो आहे.

**हरियाणात भारतीय जनता पक्षाची सत्ता दहा वर्षे असूनही तेथील सत्ताधाऱ्यांविरोधातील कथित नाराजीचा लाभ उठवण्यात काँग्रेस पक्षाला अपयश आले. तेथील जनतेची भाजपविरोधात नाराजी नव्हतीच हे विधानसभा निवडणुकीच्या निकालांनंतर पुरते स्पष्ट झाले. त्यामुळेच विजयाची हॅट्ट्रिक करीत हरियाणात तिसऱ्यांदा सत्ता स्थापन करण्याकरिता भाजप सज्ज झाला. हरियाणातील पराभवानंतर काँग्रेस पक्ष हादरला असून पक्षाच्या नेत्यांचे मनोबल पूर्णपणे खच्ची झालेले दिसते. निकालानंतर तब्बल दोन दिवस पक्षाची नेते मंडळी म्हणजे खुद्द राहुल गांधी व प्रियांका गांधी यांनी मौनच पाळणे पसंत केले. त्यानंतर हरियाणातील अनपेक्षित निकालांचे आपण विश्लेषण करीत आहोत असे त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले. सत्याचा हा संघर्ष असाच सुरू राहील अशी पराभवानंतरची नेहमीचीच विधाने करण्याची पाळी पुन्हा एकदा त्यांच्यावर आली. नाही म्हणायला, या पराभूत पक्षाने ईव्हीएम अर्थात मतदानयंत्रांविरोधातील आपली ओरड मात्र सुरूच ठेवली आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीत २० जागांवर ईव्हीएम मशीन हॅक झाल्याची तक्रार काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे केली आहे. दरवेळी पराभवानंतर ही अशी ओरड करणे अशोभनीय दिसते हे हा पक्ष कधी लक्षात घेणार आहे, कुणास ठाऊक? वास्तविक लोकसभा निवडणुकीतील आपल्या माफक यशाचा त्यांनी लावलेला अन्वयार्थ किती चुकीचा होता हेच हरियाणातील निकालांनी त्यांना दाखवून दिले आहे. लोकसभा निवडणुकीत अवघ्या ९९ जागा जिंकल्यानंतरही काँग्रेस पक्षाचा आव हा जणु काही परिवर्तन घडवून आणल्यासारखाच राहिला होता. लोकसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेस पक्षाने संविधानाच्या आधाराने अपप्रचार केला व त्याआधारे काही जागा मिळवल्या. परंतु तेवढ्यावरून हाच विजयाचा फॉम्युला आहे असा त्यांचा ग्रह झाला. त्यानंतर हरियाणातील निवडणुकीतही त्यांनी तोच अपप्रचार सुरू ठेवला. भाजप संविधान बदलणार, भाजप दलितविरोधी आहे, भाजप शेतकरीविरोधी आहे, भाजपने उद्योगपतींना गरीबांचा पैसा वाटला अशी कितीही आवई काँग्रेस पक्षाने उठवली असली, तरी हरियाणातील जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली. यावेळी तर एक्झिट पोलनीही काँग्रेसची साथ दिली होती व त्यांना हरियाणात ५० ते ६० जागा मिळतील असे दाखवले होते, परंतु प्रत्यक्षात मात्र काँग्रेसला अवघ्या ३७ जागाच मिळाल्या. काँग्रेसच्या या पराभवानंतर राज्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी काँग्रेसला थेट एक काय ती भूमिका घेण्याचे आव्हानच दिले. स्वबळावर लढायचे असेल तर तशी भूमिका काँग्रेस पक्षाने घ्यावी असे ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीतील कथित यशानंतर ताठ झालेली काँग्रेस नेत्यांची मान आता पुन्हा खाली गेली आहे. जागावाटपातील त्यांच्या आडमुठेपणाला आघाडीतील अन्य दोन पक्ष कंटाळले असावेत. पण आता काँग्रेसची नेतेमंडळी जागेवर आली आहेत असे समजते. राज्यातील सर्व २८८ मतदारसंघांबाबत नव्याने चर्चा करण्याची भूमिका उबाठा गटासह शरद पवार यांच्या पक्षानेही घेतल्याचे समजते. हरियाणात सपाटून मार खाल्लेल्या काँग्रेस पक्षाला आता मविआतील अन्य दोन पक्षांसमोर मान तुकवण्याखेरीज गत्यंतर नाही.**

# दसरा सण मोठा, आनंदाला नाही तोटा!

विजयादशमी हा भारत आणि नेपाळमध्ये दरवर्षी नवरात्रीच्या शेवटी साजरा केला जाणारा एक प्रमुख हिंदू सण आहे. याला 'दसरा', 'दशहरा' किंवा 'दशैन' या नावानेही ओळखले जाते. हा सण अश्विन महिन्याच्या दहाव्या दिवशी साजरा केला जातो. अश्विन महिना हा हिंदू सौर दिनदर्शिकेतील सातवा महिना असतो, जो सामान्यतः सप्टेंबर आणि ऑक्टोबर या ग्रेगोरियन महिन्यांत येतो. विजयादशमी म्हणजेच अश्विन शुद्ध दशमी हा दिवस भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा मानला जातो. देवीच्या घटांची स्थापना आश्विन शुद्ध प्रतिपदेला केल्यानंतर देवीची नवरात्र साजरी होती.

विजयादशमी वेगवेगळ्या कारणांसाठी साजरी केली जाते आणि भारतीय उपखंडातील नेपाळी आणि भारतातील विविध प्रांतात वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. भारताच्या दक्षिणेकडील, पूर्वेकडील, ईशान्येकडील आणि काही उत्तरेकडील राज्यांमध्ये, विजयादशमीला दुर्गापूजेची समाप्ती होते. या दिवशी देवी दुर्गाने महिषासुर या म्हशीच्या राक्षसावर विजय मिळवून धर्माचे रक्षण केले होते. उत्तर, मध्य आणि पश्चिम राज्यांमध्ये, या सणाला दसरा म्हणतात (तसेच याला दशहरादेखील म्हणतात). या प्रदेशांमध्ये, या सणाला रामलीलाची समाप्ती होते आणि देव रामाने रावणावर केलेल्या विजयाचे स्मरण केले जाते. वैकल्पिकरित्या हा सण दुर्गा किंवा सरस्वतीसारख्या देवीच्या विविध पैलूंबद्दल आदर दर्शवतो.

विजयादशमीच्या उत्सवात नदी किंवा महासागराच्या समोर मिरवणूक काढली जाते. या मिरवणुकीत देवी दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, गणेश आणि कार्तिकेय यांच्या मातीच्या मूर्ती संगीत आणि मंत्रांसह घेऊन जातात. त्यानंतर या मूर्ती पाण्यात विसर्जित केल्या जातात. इतरत्र, दसऱ्याच्या दिवशी, वाईटाचे प्रतीक असलेल्या रावणाच्या भव्य पुतळ्यांना फटाक्यांसह जाळले जाते. हे रावणदहन वाईटाचा नाश असल्याचे प्रतीक मानले जाते. विजयादशमीनंतर वीस दिवसांनी साजरा होणाऱ्या दिवाळीची तयारीही या सणातून सुरू होते.

विद्येची देवता मानल्या गेलेल्या सरस्वती देवीचे पूजन या दसऱ्याच्या दिवशी विशेषत्वाने केले जाते. याच दिवशी अपराजिता देवीची पूजा करतात. दसऱ्याच्या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून जाण्याची प्रथा प्रचलित आहे. लोक या दिवशी परस्परांना सोने म्हणून आपट्याची पाने देतात. सायंकाळी गावाची सीमा ओलांडून ईशान्येस जायचे, शमीच्या किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करायची, तेथे अष्टदल रेखाटून त्यावर अपराजिता देवीची स्थापना करावयाची आणि तिला प्रार्थना करावयाची की, मला विजयी कर. त्यानंतर योद्ध्यांनी शस्त्र पूजन, व्यापाऱ्यांनी व्यापारासाठी प्रयाण व विद्यार्थ्यांनी सरस्वतीपूजन करायचे अशी प्रथा होती. मुले पाटीवर सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून त्या पाटीची पूजा करतात. पुस्तकांची आणि वह्यांचीही पूजा होते.

प्रारंभी हा एक कृषिविषयक लोकोत्सव होता. पेरलेल्या शेतातील पहिले पीक यावेळी घरात येई, त्या वेळी शेतकरी हा उत्सव करीत असत. ग्रामीण भागात शेतातील धान्याचा तुरा आपल्या फेट्यात लावण्याची पद्धतीही प्रचलित आहे. काही लोक ते कानांवर खोचतात तर काही टोपीवर लावतात. साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त मानल्या गेलेल्या विजयादशमीला एखाद्या नवीन कार्याची सुरुवात करतात. नवी वाहने, वास्तू तसेच कपड्यांची खरेदी, सोन्याची खरेदी होते.

**पौराणिक संदर्भ**

श्रीरामाने विजयादशमीच्या दिवशी रावणाचा वध केला. या दिवशी पांडव अज्ञातवास संपवून परत निघाले अशीही आख्यायिका आढळून येते. पांडवांनी अज्ञातवासात जाण्यापूर्वी आपली शस्त्रे शमीच्या झाडावरील एका ढोलीत लपवून ठेवली होती. त्यापैकी गांडीव धनुष्य आणि काही बाण बृहन्नडेच्या रूपात असलेल्या अर्जुनाने विराटाच्या गायी सोडवून आणण्यासाठी वापरले आणि त्या कामगिरीनंतर परत झाडावर ठेवून दिले अशी कथा आढळून येते. त्यामुळे विजयादशमीला शमीची पूजा करून त्याला औक्षण केले जाते. विजयादशमी या दिवशी ज्या वृक्षाची पाने लुटली जातात त्या वृक्षाला अश्मंतक असे म्हणतात. ही पाने पित्त व कफ दोषांवर गुणकारी आहेत.

रामायणानुसार रावणाने सीतेचे अपहरण केले आणि तिला लंकेत घेऊन गेला. भगवान रामाने रावणाला सीतेला सन्मानाने वापस करण्याचे आवाहन केले, परंतु रावणाने सीतेला वापस पाठवण्यास नकार दिला आणि शेवटी युद्ध सुरू झाले. रावणाला ब्रह्मदेवाकडून एक अमरत्वचे वरदान मिळाले असते. शेवटी विभीषणाच्या सल्ल्यानुसार राम रावणाचा वध करतो. या दिवसाची आठवण म्हणून, सत्याचा असत्यावर विजय, न्यायाचा अन्यायावर तसेच नीतीचा अनितीवर विजय म्हणून या दिवशी भारतात अनेक ठिकाणी रावणाचा पुतळा जाळला जातो. (साभार : विकिपीडिया)

# राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचा स्थापना दिवस

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (एनएचआरसी)ची स्थापना १२ ऑक्टोबर १९९३ रोजी, मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ च्या कायद्यांतर्गत करण्यात आली, ज्यात नंतर २००६ मध्ये मानवी हक्क संरक्षण कायद्याद्वारे सुधारणा करण्यात आली. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग हा एमपीएससी पॉलिटी अभ्यासक्रम तसेच MPSC चालू घडामोडी विभागातील एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. आजच्या लेखात आपण राष्ट्रीय मानव अधिकार आयोग काय आहे या विषयाची संपूर्ण माहिती घेणार आहोत.

एनएचआरसी म्हणजे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग. ही एक गैर-संवैधानिक संस्था आहे जी देशातील मानवी हक्कांचे जतन आणि संरक्षण करण्यासाठी वॉचडॉग म्हणून काम करते. हा घटक एमपीएससी एक्झाम आणि इत्यादी परीक्षांसाठी उपयुक्त आहे. युनायटेड नेशन्सच्या मते, प्रत्येक व्यक्तीला जीवनाचा हक्क, स्वातंत्र्य, समानता, मतस्वातंत्र्य, गुलामगिरीपासून मुक्तता इत्यादीसारख्या विशिष्ट अधिकारांची हमी दिली जाते. या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोग त्याच क्षेत्रात कार्य करतो.

एनएचआरसीचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे आणि १२ ऑक्टोबर २०१८ रोजी त्याचा २५वा वर्धापन दिन साजरा केला जातो. एनएचआरसी म्हणजे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग. हा आयोग भारत सरकारने मानवी हक्क कायदा १९९३च्या संरक्षणाखाली दर्जेदार मानवी जीवनासाठी आवश्यक असलेल्या अनेक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी स्थापन केला होता, ज्यामध्ये स्वातंत्र्य, समानता, गुलामगिरीपासून स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य इत्यादी.

या ग्रहावर उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला एक विशिष्ट प्रतिष्ठा आहे आणि त्याला त्यासोबत जगण्याची परवानगी आहे. म्हणूनच, मानवी जीवनाचा सन्मान राखण्यासाठी, त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांना दर्जेदार जीवन देण्यासाठी एनएचआरसीची स्थापना करण्यात आली. हे अधिकार भारतीय संविधानाद्वारे हमी दिलेले आहेत आणि भारतातील उच्च न्यायालयांद्वारेही त्यांची अंमलबजावणी केली जाते.

एनएसआसी प्रमाणेच, मानवी हक्कांचे पॅरिस तत्त्वदेखील १९९१मध्ये स्थापित केले गेले. एनएसआसी त्याचे पालन करत आहे. हा विषय १९९३मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने स्वीकारला होता.

एनएसआसी ही संकल्पना कशी आणि केव्हा सुरू झाली ते पाहू. युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिसमध्ये मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा स्वीकारला. ही कारवाई मानवजातीच्या इतिहासात एक महत्त्वाची खूण ठरली जिथे मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एक पाऊल उचलले गेले. त्यानंतर लगेचच १९९१मध्ये राष्ट्रीय मानवाधिकार संस्थांनी पॅरिस तत्त्वे सादर केली, ज्यांना एनएचआरआयएस म्हणून ओळखले जाते.

१९९३ मध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ही तत्त्वे स्वीकारली आणि त्याच वर्षी भारताने मानवी हक्क संरक्षण कायदादेखील लागू केला. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचा पाया रचण्याची ही पहिलीच वेळ होती. मानवी हक्क जपण्याचे महत्त्व मोठमोठ्या संस्थांना कळू लागले, परिणामी पॅरिसची तत्त्वे यूएनने स्वीकारली आणि या तत्त्वांनुसार भारतानेही एक पाऊल पुढे टाकले आणि १९९३मध्ये मानवी हक्क कायद्याच्या निर्मितीचे स्वागत केले. भारतातील राज्य सरकारांनाही मानवाधिकार आयोग स्थापन करण्यासाठी उच्च न्यायालय आणि घटनेने अधिकृत केले होते व त्यांना सांगितले होते. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅपवर आता फोटो एडिट फीचर्स

जगभरात जलद मेसेजसाठी व्हॉट्सअॅप हे अॅप वापरले जाते. कोट्यवधी नागरिक या अॅपचा वापर करतात, त्यामुळे व्हॉट्सअॅप कंपनीकडूनही त्यांच्या युजर्ससाठी नवनवीन फीचर्स, अपडेट आणले जातात. आता कंपनीने व्हॉट्सअॅपवरच्या मेटा एआय असिस्टंटसाठी मोठा अपडेट जाहीर केला आहे, ज्यात नवीन आवाज, फोटो एडिट फीचर्सचा समावेश आहे. म्हणजेच आता तुम्ही चॅटिंगबरोबर फोटो एडिट अॅपचाही आनंद व्हॉट्सअॅपमध्ये घेऊ शकणार आहात.




मेटा एआय जलद प्रगती करत आहे आणि आम्ही जगभरातील लोकांसाठी नवीन फीचर्स आणण्यात आनंदित आहोत. कृपया तुमचा अनुभव शेअर करत राहा आणि तुम्ही Meta AI कशा पद्धतीनी वापरत आहात ते Threadsवर आम्हाला टॅग करा. व्हॉट्सअॅपवर मेटा एआय सादर केल्याच्या एका वर्षात या तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्यांकडून अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे, असे कंपनीने सांगितले.

टॉक टू मी : मेटा एआय म्हणजे एक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली आहे, जी तुमच्या प्रश्नांना उत्तर देईल. तुम्ही तिला विचारलेल्या गोष्टींवर माहिती देऊ शकते, तुमच्याशी संवाद साधू शकते आणि ती तुम्हाला सहाय्यसुद्धा करू शकते. काहीही विचारण्यासाठी फक्त वेव्हफॉर्म बटण दाबा, प्रेस करून ठेव. जसजसे हे फीचर रोल आउट करणे सुरू होईल, तसतसे तुम्हाला जगभरातील सेलिब्रिटींच्या आवाजासह विविध व्हॉइस पर्यायांमधून निवडण्याचा पर्यायदेखील दिला जाईल.

लूक अॅट दीस : आता तुम्ही मेटा एआयला फोटो पाठवून तुमच्या आसपासच्या जगाबद्दल उत्तर मिळवू शकता. उदाहरणार्थ, जर तुम्ही विदेशी भाषेतल्या मेनूचा फोटो काढून मेटा एआयला पाठवला, तर तो तुम्हाला भाषांतर करून देईल किंवा जर तुम्ही एखाद्या झाडाचा फोटो पाठवून त्याची काळजी कशी घ्यावी हेसुद्धा विचारू शकता.

एडिट माय फोटो : Meta AI आता तुम्हाला तुमचे फोटो एडिट करण्यास मदत करू शकते. तुम्ही काही गोष्टी त्यात जोडू, काढू किंवा बदलू शकता. उदाहरणार्थ, तुम्ही बॅग्राऊंडमधून एखाद्या व्यक्तीला काढू शकता किंवा एखाद्या वस्तूचा रंग बदलून पाहू शकता, तर अशा फीचर्सचा तुम्ही वापर करू शकणार आहात.

# कवयित्री आणि गीतलेखिका शांता शेळके

शांता शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे जनार्दन शेळके यांच्याकडे झाला. यांचे शिक्षण हुजूरपागा शाळा व स.प. महाविद्यालय पुणे येथे झाले. त्यांनी नागपुरातील हिस्लॉप महाविद्यालय, मुंबईतील रुईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयांमध्ये मराठीच्या अध्यापिका म्हणून काम केले. आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग'मध्ये उपसंपादक म्हणून पाच वर्षे कार्य केले.



**निमित्त**

१९३८ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बी. ए. झाल्या. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख लिहू लागल्या. १९४४मध्ये संस्कृत घेऊन शांताबाई एम.ए. झाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रूईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

१९९६ साली आळंदीमध्ये अखिल भारतीय संमेलनाच्या अध्यक्षपदी त्याने कार्य केले. त्या एक प्रतिभासंपन्न मराठी कवयित्री, प्राध्यापक, संगीतकार, लेखिका, अनुवादक, बाल-साहित्य लेखिका, साहित्यिक आणि पत्रकार होय. अनुवादक, समीक्षा स्तंभ लेखिका, वृत्तपत्र, सह संपादिका म्हणूनदेखील यांचा साहित्यात मोलाचा वाटा आहे. शांताबाई या केंद्रीय फिल्म प्रमाण मंडळ तसेच राज्य नाटक परिनिरीक्षण मंडळाच्या त्या सदस्य म्हणून होत्या. डॉ. वसंत अवसरे या टोपण नावाने त्यांनी गीते लिहिली आहे. त्यांना अनेक कथा, कादंबऱ्या, कविता लिहिल्या आहे. त्यांचे निधन ६ जून २००२ रोजी झाले.

त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित केले आहे. यांच्यावर काही पुस्तके प्रकाशित झाल्या आहे. कविता, गीत, चित्रपटगीत, कथा, कादंबरी, बालसाहित्य अशा विविध साहित्यप्रकारात शांताबाईंची जवळपास शंभर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'वर्षा' (१९४७) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. 'रूपसी' (१९५६), 'तोच चंद्रमा' (१९७३), 'गोंदण' (१९७५), 'कळ्यांचे दिवस', 'फुलांच्या राती' (१९८६), 'जन्मजान्हवी' (१९९०), 'चित्रगीते' (१९९५), 'पूर्वसंध्या' (१९९६), 'इत्यर्थ' (१९९८) हे त्यांचे इतर काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'मुक्ता' (१९४४), 'गुलमोहोर' (१९४९), 'प्रेमिक' (१९५६), 'काचकमळ' (१९६९), 'सवाष्ण' (१९७४), 'अनुबंध' (१९८०), 'बासरी' (१९८२), हे कथासंग्रह; 'विझली ज्योत' (१९४६), 'नरराक्षस' (१९४८), 'पुनर्जन्म' (१९५०), 'धर्म' (१९७३), 'ओढ' (१९७५), 'स्वप्नतरंग', 'कोजागिरी', 'मायेचा पाझर', या त्यांच्या कादंबर्या आहेत. सौंदर्यदृष्टी, रसिकता, मानवी मनोभूमिका आणि सहजता ही त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये होत.

**(साभार : इंटरनेट)**


**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची शुक्रवारी यशस्वी चाचणी करण्यात आली. या वेळी वायुदलाचे सी-२९५ विमान धावपट्टीवर उतरले असता वॉटर सॅल्यूट करण्यात आला. या क्षणाचे टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# केसांची गळती होण्याची ही आहेत कारणे...



आजकाल केस गळण्याची समस्या सार्वत्रिक झालेली आहे. अगदी पौगंडावस्थेपासून ते ८० वर्षांपर्यंतचे रुग्ण केस गळतीसाठी डॉक्टरांकडे येतात. मानवाच्या डोक्यावर साधारणपणे ८० हजार ते एक लाख केस असतात. हे केस मूल जन्मतःच बरोबर घेऊन येते आणि हा आकडा नंतर वाढत नाही. आपले दररोज साधारणतः ५० ते ७० केस त्यांचे आयुष्य संपल्यामुळे गळून पडतात, परंतु त्यांची जागा नवीन केस घेत असतात. त्यामुळे आपल्या डोक्यावरचे केसांचे छप्पर पूर्ववत राहते.

टक्कल पडणे यालाच पॅटर्न हेअर लॉस असे म्हणतात कारण ही केस गळती एका विशिष्ट प्रकारे होत असते. हा प्रकार स्त्रियांमध्येदेखील आढळतो. परंतु त्याचा पॅटर्न वेगळा असतो. पन्नाशीपर्यंत पन्नास टक्के पुरुषांमध्ये, तर सत्तरी पर्यंत ४०% स्त्रियांमध्ये टक्कल पडण्याचा प्रादुर्भाव दिसून येतो. आता तुमच्या लक्षात येईल की, ८० वर्षांच्या आजींचे केस का कमी झाले. पूर्वी ही नैसर्गिक बाब म्हणून स्वीकारली जायची. आजचे आधुनिक स्त्री-पुरुष हे वास्तव स्वीकारताना दिसत नाहीत.

आज टक्कल पडणे हे पन्नाशीच्या आधी आणि तरुण वयात अधिकाधिक प्रमाणात दिसू लागले आहे. काय कारणे आहेत टक्कल पडण्याची? स्त्री आणि पुरुष दोघांच्याही बाबतीत अनुवंशिकता किंवा जीन्सच्या प्रभावामुळे टेस्टोस्टेरॉन या संप्रेरकाचा केसांच्या मुळावर परिणाम होऊन केस हळूहळू पातळ होऊ लागतात आणि कालांतराने समूळ नष्ट होतात.

ताणतणाव, आहारातील बदल, बैठी जीवनशैली यामुळे तरुण मुलींमध्ये अनियमित पाळी, वाढलेले वजन, सतत येणारी मुरमे, गळणारे केस व चेहरा आणि इतर त्वचेवर येणारे जाड केस. ही आहेत पीसीओएसची लक्षणे. पुरुषांमध्ये देखील वाढलेले वजन, ताण-तणाव बैठी जीवनशैली आणि धूम्रपान यामुळे लवकर टक्कल पडण्याची शक्यता असते.

## निवडक

### आदिवासी समाजाला भांडीवाटप



**मुरूड** : तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायतीतर्फे आदिवासी समाजातील लोकांना भांडी तर अपंग बांधवांना चेकद्वारे रक्कम वाटप करण्यात आली. सरपंच ऋतुजा वरणकर यांच्या अध्यक्षतेखाली वाटप करण्यात आले. या वेळी उपसरपंच सुवरणा भुवड, ग्रामपंचायत सदस्य नीलम भुवड, गौतमी मोरे, शाईनदा कडू, जयंत कासार, माजी सरपंच हरिश्चंद्र भेकरे, दीपेश वरणकर आदी उपस्थित होते.

### नवतरुण मित्र मंडळातर्फे कार्यक्रम



**पाली** : म्हसळा तालुक्यातील खारगाव खुर्द गावातील नवतरुण मित्र मंडळातर्फे नवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या वर्षी मंडळाचे हे २५वे वर्ष आहे. यंदा मंडळामार्फत संगीत खुर्ची, गरबा नृत्य याबरोबरच लहान मुलांचा बाल्या डान्स आयोजित करण्यात आला. याबरोबरच व्याख्यानदेखील आयोजित करण्यात आले होते.महिलांचे हळदी कुंकू व नाचाचे कार्यक्रम होत आहेत. होमहवन व महाप्रसादाचे सुरू आहे. तसेच फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष विश्वास राकेश खोत, हेमंत माळी अनंत मेंदाडकर, लक्ष्मण मेंदडकर, पांडुरंग, बाळकृष्ण पाटील तसेच सर्व मंडळाचे सभासद यांनी मेहनत घेतली.

# जंजिरा किल्ल्याजवळ जेट्टीची प्रतीक्षा

## बोटीतून उतरताना पर्यटकांना करावी लागते कसरत

**मुरूड : प्रतिनिधी**

राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याजवळ प्रवाशांना चढ-उतार करण्यासाठी जेट्टीचे काम सुरू केले होते. हे काम सध्या बंद असल्याने ही जेट्टी कधी पूर्ण होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ऐतिहासिक जंजिरा हा किल्ला समुद्राच्या मध्यभागी असल्याने हा किल्ला पाहण्यासाठी शिडाच्या बोटीतून पर्यटकांना ने-आण केली जाते. किल्ल्याजवळ पोहोचल्यावर प्रचंड लाटांच्या तडाख्यामुळे बोटी हेलकावे खात असल्याने बोटीतून उतरताना मोठी कसरत करावी लागत होती. काही पर्यटक तर उतरताना गंभीर जखमी झाले आहेत. याची दखल घेत शासनाने सागरमाला योजनेंतर्गत किल्ल्याच्या पश्चिमेकडे जेट्टी बनवण्यासाठी ९३ कोटी ५६ लाख रुपये निधी पुरातत्व विभागाने मंजूर केला आहे.

हे काम किल्ल्याचा मुख्य प्रवेश पश्चिमेला असल्याने पुरातत्व विभागाने व तज्ज्ञांनी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांसह पाहणी करून समुद्राच्या लाटांची तीव्रता पाहून ५०० पर्यटक सुरक्षित उतरतील, अशी भव्य जेट्टी बनविण्यास सुरुवात केली आहे. समुद्राच्या लाटांचा प्रभाव कमी करण्यासाठी २५० मीटर लांबीची लाटरोधक भिंतीही उभारण्यात येणार आहे, मात्र सध्या हे काम बंद आहे. लवकरात लवकर जेट्टीचे काम सुरू करावे, अशी मागणी होत आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे इंजिनिअर दिपक पवार यांना विचारले असता, प्रवासी जेट्टीच्या कामाला डिसेंबर २०२३ मध्ये सुरुवात केली होती. हे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. पावसाळ्यात काम बंद होते. आता जागेवर काम सुरू नसले तरी जेट्टीला लागणाऱ्या मटेरियलचे काम सुरू आहे. जेट्टी फेब्रुवारी किंवा मार्च २०२४ यादरम्यान पर्यटकांसाठी खुली होईल, अशी अशी माहिती दिली.





**नागोठणे : भाजपच्या रायगड जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे यांना वाढदिवसानिमित्त शहराध्यक्ष सचिन मोदी, रिलायन्स कंपनीचे कामगार नेते राजेंद्र लवटे, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, शहर उपाध्यक्ष गौतम जैन, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, सुरेश जैन यांनी शुभेच्छा दिल्या.**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

# रातवड विद्यालयाचे विद्यार्थी रंगले पालखी सोहळ्यात; लेझीमसह हरिनामाचा जागर



**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाने शारदोत्सवानिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे शारदोत्सव पालखी सोहळ्याचे आयोजन घोटवळ गावात गुरुवारी (दि.१०) केले होते. या पालखी सोहळ्यात विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सकाळी गावातील मान्यवर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत ज्ञानेश्वर माऊली व शारदामातेची आरती करण्यात आली. संपूर्ण गावात पालखी काढण्यात आली. पालखीसोबत ग्रामस्थांचे भजन, लेझीम पथक व ढोलताशांची सोबत होती. सुस्वर भजन, पारंपारिक नृत्य, फुगडी घालून पालखी सोहळ्याचा आनंद विद्यार्थी, ग्रामस्थांनी घेतला. पालखी सोहल्यानंतर विद्यालयात श्री सत्यनारायण महापूजा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध प्रकारची पारंपारिक नृत्य सादर करण्यात आली. विद्यालयात यानिमिताने सत्यनारायण महापूजा झाली. उत्तरपूजा व आरती होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सांस्कृतिक प्रमुख अजित शेडगे यांनी नियोजन करून सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य करून मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम झाला.

सामाजिक कार्यकर्ते दिपक जाधव, दत्ताराम फराडे, शांताराम कसबले, अशोक मालुसरे, केशव येलकर आदींसह महिला मंडळाचे विशेष सहकार्य लाभले.विद्यार्थ्यांना खाऊ व अल्पोपहार ग्रामस्थांनी दिला.


**MAHAVITARAN**

**Invitation for bids on E-Tendering basis**

Tenders in e-tendering format are invited vide Tender No: SE/Pen/HR/T-11/2024-25. Brief scope of work for Contract is as below:

T-11 (Rs.640 Lakh): Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Alibag division under Pen circle.

- Tender fee Rs.10000/- and GST will be applicable.
- Publication of NIT in News Paper and MSEDCL Web site : 12/10/2024
- Last Date & time (Hours) for submission of bid: 12/10/2024 To 20/10/2024 up to 23:55 Hrs online.

**For details visit website** http://etender.mahadiscom.in/eTender/eatApp

**Superintending Engineer, MSEDCL, O&M circle, Pen**


### झेंडू फुलांच्या दरात वाढ

**अलिबाग** : दसरा सणानिमित्त झेंडूच्या फुलांना मागणी वाढली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात झेंडूची मोठी आवक झाली आहे. यंदा झेंडूचा दर वाढला आहे. बजारात १५० ते २०० रुपये किलो दराने झेंडू विकला जात आहे.

नवरात्र उत्सवाच्या काळात झेंडूचा दर १०० ते १२० रूपये प्रतिकिलोपर्यंत होता. दसरा असल्यामुळे हा दर १५० रूपये प्रतिकिलोवर गेला आहे. काही ठिकाणी २०० रुपये किलो दराने झेंडूची फुले विकली जात होती.


**परिशिष्ट क्र. १६**

(उपविधी क्र. ३५ अन्वये )

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या या संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ... धारण करणाऱ्या **श्री लक्ष्मण नीळकंठ नातू** यांचे तारीख **२५/०१/२०२४** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी/ दुपारी **१२.००** ते सकाळी/ दुपारी **४.००** वा पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल
दिनांक : ११/१०/२०२४

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.**
**सेक्टर २, नवीन पनवेल**



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- kbmc@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. कु.ब.न.प/साबां/१३२२/२०२४-२०२५ दिनांक : ११/१०/२०२४

**जाहिर निविदा सुचना क्र. ३७/२०२४-२५**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत खालील ०२ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामांचे निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. १४/१०/२०२४ ते दि.२३/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे. व सदर निविदा शक्य झाल्यास दि. २४/१०/२०२४ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील. निविदे बाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**



## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ७४ सन २०२४-२०२५**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासना कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बो-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक ११/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १८/१०/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईनखरेदीकरण्यांत येतील. व **दिनांक२१/१०/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतों **दिनांक २१/१०/२०२४ रोजी १०.०० वाजता** उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे साखर येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६०६२ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| २ | ग्रुप ग्रामपंचायत भोगाव खुर्द आदिवासीवाडी स्मशानभुमी बांधण तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६२७८ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ३ | ग्रुप ग्रामपंचायत भोगाव खुर्द दत्तवाडी स्मशानभुमी बांधणे तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६२७५ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ४ | मौजे भानंग ग्रुप ग्रामपंचायत भानंग सभामंडप सुशोभीकरण करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६१३९ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ५ | ग्रुप ग्रामपंचायत भोगाव खुर्द अंतर्गत पेव्हर ब्लॉक रस्ता करणे, तालुका पोलादपुर, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१५७६७ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ६ | मौजे भानंग ग्रुप ग्रामपंचायत भानंग येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१५६८७ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ७ | मौजे अडनाळे ग्रुप ग्रामपंचायत काकडशेत येथे सामाजिक सभागृह बांधणे व शेड तयार करणे, तालुका तळा, जिल्हा रायगड . मौजे भानंग ग्रुप ग्रामपंचायत भानंग येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१५८३९ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ८ | मौजे जसवली येथे सभागृह बांधणे, तालुका श्रीवर्धन जिल्हा रायगड (२५१५) | ८१६२९० | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ९ | मौजे कोलामांडले येथे सभागृह बांधणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६२६९ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| १० | मौजे दांडगुरी गाव रस्ता तयार करणे तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६०९३ | ९०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| ११ | मौजे तांबडी ग्रुप ग्रामपंचायत भानंग येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | ६५२६७० | ७०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| १२ | मौजे वारळ, दत्तावाडी येथील दत्तमंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (२५१५) | ६५२३८० | ७०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात व वरिल |
| १३ | मौजे तळेगाव ग्रुप ग्रामपंचायत तळेगाव येथे सभामंडप बांधणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. (२५१५) | ४०८०७१ | ५०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग आठ व वरिल |

**टिप :-** तपशिलवार निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ ४९२५**
**दिनांक : १०/१०/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/२१२**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे - जुई, तालुका उरण, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १०१/४७ | ०-८६-२०<br>पो.ख. ०-११-००<br>**एकूण ०-९७-२०**<br>**पैकी ०-२७-७७** | ८.४५ | **श्रीमती विमल परशुराम पाटील<br>श्रीमती सुनंदा वसंत पाटील<br>श्रीमती मथुरा जयवंत कामोठकर<br>श्रीमती विठाबाई हिराजी पाटील<br>श्रीमती इंदुमती शंकर भोईर<br>श्रीमती ताराबाई भालचंद्र पाटील<br>श्री. भुषण भालचंद्र पाटील<br>सौ. माधुरी लक्ष्मण भोईर<br>श्रीमती नामुबाई तुकाराम पाटील<br>श्रीमती इंदिरा उर्फ ईंद्रा घनश्याम भोईर<br>श्रीमती रसिका मणिलाल मढवी<br>सौ. हर्षाली विनायक भोपी<br>श्रीमती किर्ती चंद्रकांत पाटील<br>श्री. वर्तक महादेव पाटील<br>श्रीमती मिनाक्षी मुकुंद पाटील<br>श्री. धनेश मुकुंद पाटील<br>श्री. सचिन मुकुंद पाटील<br>श्रीमती दर्शना स्वप्नील घाटे<br>श्रीमती पुजा समाधान गोवारी<br>श्रीमती हेमलता गजानन गोवारी<br>श्री. अरुण पोशा पाटील<br>श्रीमती आंबीबाई नारायण पाटील उर्फ आंबीबाई गोमाजी भोईर<br>गिरीजाबाई जाना कामोठकर** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ११/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट**
**वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ**
**अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**
**मो. क्र. : ९९३०३६९८६१**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही जमिन मालक **सगुणा नामदेव ठाकूर, हरी कानु पाटील, शिवाजी हरी भालेराव, भगवान हरी भालेराव, किसन हरी भालेराव, माणिकीबाई नामदेव लभडे, जनाबाई परशुराम पाटील, हनुमान वाघु लभडे, जयवंत वाघु लभडे, शेवंताबाई पांडूरंग दुर्गे, मुक्ताबाई जयराम भालकर, सुमान काशिनाथ झुगारे, शेवंता दत्तात्रय बोलाडे, तुळसाबाई भानुदास भालेराव, विमल तुकाराम मुंढे, प्रकाश जनार्दन पाटील, वैशाली रमेश पाटील, अंजना ज्ञानेश्वर फराड, वंदना भगवान बडेकर, मनुबाई सिताराम पाटील, मोहिनी सिताराम पाटील, रोहिणी सिताराम पाटील, रसिका सिताराम पाटील, योगिता सिताराम पाटील, उर्मिला लक्ष्मण लबडे, मंगेश लक्ष्मण लबडे, संदेश लक्ष्मण लबडे, योगेश लक्ष्मण लबडे, आत्माराम दुंध्या पाटील, राजेश्री राजेंद्र पाटील, नयन राजेंद्र पाटील, विवेक राजेंद्र पाटील, जनाबाई चिंतामण आगीवले, द्रौपदीबाई पांडूरंग पाटील, पुंडलिक पांडूरंग पाटील, अरुण पांडूरंग पाटील, भारती भगवान घोंगे, दर्शना पांडूरंग मोरे, तुकाराम हिरु पाटील, सुरेखा सुरेश म्हसकर, कांता बबन भालेकर, इंदु विष्णु दुर्गे, वनिता प्रमोद सोनावळे, सुनंदा महादेव पिंगळे, आत्माराम पांडूरंग गोजे, वंदना भगवान लबडे, मयुर भगवान लबडे, धनश्री भगवान लबडे, अर्चना पांडूरंग महाडीक, कुंदा दत्तात्रय पाटील, हनुमंत लक्ष्मण काठावले, अनिता पुंडलिक बोलाडे, कविता लक्ष्मण ठोंबरे, आत्माराम लक्ष्मण काठावले, मनिषा भगवान ठोंबरे, अशोक पांडूरंग गोजे, माणिक महादेव लबडे, रोहिणी राजेंद्र सोनावले, शैला मनोज जाधव, उषा प्रकाश घेवडे, साईनाथ नामदेव लबडे, कोमल कल्पेश दुर्गे** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे - अरिवली, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ३३/२ | ०-५१-३०<br>पो. ख. ०-०३-८०<br>एकूण ०-५५-१०<br>पैकी ०-२७-३०<br>+ पो.ख. ०-०३-८० | ९.८८ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ११/१०/२०२४**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट**
**वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ**
**अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**
**मो. क्र. : ९९३०३६९८६१**


वाईट प्रवृत्तींचे दहन करुन चांगल्या
गुणांचे संवर्धन करण्याचा संदेश देणाऱ्या
विजयादशमी
अर्थात दसऱ्याच्या
सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !!
TIPL
शु | भे | च्छु | क
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
• Tel. : 022 27452713, 9769409120
• Email : thakurinfraprojects@gmail.com
• Web : www.thakurinfraprojects.in

# खालापूरची पाणी समस्या होणार दूर

## आमदार महेंद्र थोरवे यांची ग्वाही; योजनेचे भूमिपूजन

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत हद्दीतील पाणी समस्या मार्गी लावण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. २३.२५ कोटी रुपयांची पाणी योजना १८ महिन्याच्या कालावधीत पूर्ण होईल, असे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले. त्यांच हस्ते पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन करण्यात आले.



खालापूर नगरपंचायत हे खालापूर तालुक्याचे ठिकाण असून गेली अनेक वर्ष येथे पाणीपुरवठा नियमीत होत नाही. खालापूर ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्य झाले, पण येथील पाणी समस्या कायम राहिली. आम्ही लोकांना पाणी देऊ शकलो नाही. त्यामुळे तीस टक्के लोक खोपोली व अन्य परिसरात राहण्यास गेले आहेत, असे प्रास्ताविकात माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम यांनी सांगितले.

आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, खालापूरचा आर्थिक विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. हे ऐतिहासिक गाव जगाच्या नकाशावर आर्थिक सक्षम व नियोजित शहर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कलोते धरणातून पाणीपुरवठा केला जाणार असून महड, खालापूर गाव, निंबोडेवाडी, दांडवाडी व शिरवली येथे पाण्याच्या स्वतंत्र टाक्या बांधण्यात येणार आहेत. तीन लाख लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया करून या टाक्यांमध्ये पाणी सोडले जाईल. त्यामुळे लवकरच खालापूरकर आपल्या गावी राहण्यास येतील.

या कार्यक्रमास शिवसेना संपर्कप्रमुख विजय पाटील, तालुका युवा अधिकारी रोहित विचारे, नगराध्यक्ष मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, ज्येष्ठ नेते संजय देशमुख, नगरसेवक गोपी शहा, किशोर पवार, श्वेता गुरव, लता लोते, उज्वला निधी, महेश पवार, भाजप खालापूर अध्यक्ष दीपक जगताप, डॉ. क्षमा आठवले आदी उपस्थित होते.

# माथेरानमधील मंदिर कामांचा शुभारंभ



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगरपालिका हद्दीतील पंचवटी नगर व छत्रपती शिवाजी महाराज नगर येथील मंदिरांच्या कामाचे भूमिपूजन शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते झाला. या वेळी पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि येथील स्थानिक नागरिक उपस्थित होते.

कर्जत खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी आपल्या आमदार निधीतून माथेरान येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर मंदिराला १० लाख आणि पंचवटी नगर येथील मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी १० लाख रुपये निधी दिला आहे. या मंदिराच्या कामांचा भूमिपूजन सोहळा आमदार थोरवे रांच्या हस्ते होणार होता, मात्र काही कारणास्तव आमदार येऊ शकले नाहीत. म्हणून शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते दोन्ही ठिकाणांचे भूमिपूजन करण्यात आले.

# चौक ग्रामपंचायतीतर्फे विविध वस्तूंचे लाभार्थ्यांना वाटप

**चौक : प्रतिनिधी**

चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने हद्दीतील लाभार्थ्यांना ग्रामपंचायत निधीतून १५ टक्के वाटप मागणीनुसार साहित्य देण्याचा कार्यक्रम सरपंच रितू ठोंबरे व सदस्यांच्या हस्ते नुकताच झाला.



खालापूर तालुक्यातील चौक ही आर्थिक सक्षम असलेली ग्रामपंचायत असली तरी करवसुलीसाठी प्रतिसाद मिळत नसल्याने १५ निधी वाटपाला थोडा उशीर झाल्याचे सरपंच रितू ठोंबरे यांनी या वेळी सांगितले. आपल्या मागणीनुसार दिलेल्या साहित्यामधून उदरनिर्वाह साधन निर्माण होणे अपेक्षित असल्याचे सांगून यातून सामुदायिक रोजगार उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी म्हटले.

नम्राचीवाडी, इर्शाळवाडी, मोरबे बौद्धवाडा, कातकरवाडी, नानिवली ठाकूरवाडी, वरोसे कातकरवाडी, वरोसे होळीचा माळ, चौकमधील कातकरवाडी, बौद्धवाडा, वडारवाडा, बुरुडवाडी, जांभिवली बौद्धवाडा, हातनोली येथील रोहिदासवाडा, बौद्धवाडा, कातकरवाडी, हातनोलीपाडा येथील लोकांना सामुदायिक कार्यक्रमास, सामुदायिक वापर व त्यातून व्यवसाय निर्माण करण्यासाठी जेवणाची भांडी, बेंजो,सतरंजी, जेवणाचे टेबल, मंडप साहित्य, खुर्च्या, शेगडी देण्यात आले.

या कार्यक्रमास उपसरपंच सुभाष पवार, विधीज्ञ सदस्य रिना सोनटक्के, राजन गावडे, राजू पाटील, अंकुश वाघ, लक्ष्मी वाघ, ग्रामस्थ, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोकादायक विद्युत खांब काढण्यास सुरुवात

**माथेरान : प्रतिनिधी**

दैनिक रामप्रहर वृत्तपत्राच्या बातमीची दखल घेत महावितरणकडून माथेरान ई-रिक्षा स्टॅण्डजवळील धोकादायक अवस्थेत असलेले विद्युत खांब काढण्यास सुरुवात झाली आहे.



पर्यटनस्थळ माथेरानमध्ये अनेक ठिकाणी विद्युत खांब गंजलेले व जीर्ण झालेल्या अवस्थेत असल्याच्या तक्रारी स्थानिकांनी महावितरणाकडे केल्या होत्या. गंजलेले विद्युत खांब वादळी पाऊस, वाऱ्यांमुळे केव्हाही उन्मळून पडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. याबाबत दै. रामप्रहर वृत्तपत्रात धोकादायक विद्युत खांब हटविण्याची मागणी अशा आशयाचे वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. या बातमीची दखल घेत महावितरणचे कनिष्ठ अभियंता संतोष पादीर यांनी ई-रिक्षा स्टॅण्डजवळील धोकादायक विद्युत खांब काढण्यास सुरुवात केली आहे.

# जय भवानी मित्र मंडळातर्फे रक्तदान शिबिर





**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील जय भवानी मित्र मंडळातर्फे नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवातील सामाजिक उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ३३ रक्त पिशव्या संकलीत करण्यात आल्या.

मंडळाच्या नवरात्रोत्सवाचे यंदाचे ३०वे वर्ष आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मंडळातर्फे विविध धार्मिक, सांस्कृतिक, मनोरंजन आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. सामाजिक उपक्रमांतर्गत गोंधळपाडा समाजमंदिर येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष मनोज पडियार यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य सुमित चव्हाण, महेंद्र पडियार यांनी शिबिरासाठी विशेष मेहनत घेतली. या वेळी गोंधळपाडा गावासह आजूबाजूच्या परिसरातील तरुणांसह नागरिकांनी रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीचे अधिकारी डॉ. दीपक गोसावी, सुशांत भगत, तंत्रज्ञ हेमकांत सोनार, वैभव कांबळे, गणेश भोय, मनीष कुंभार, महेश घाटगे, मंगेश पिंगळा या पथकाने रक्त संकलनास सहकार्य केले. रक्तदात्यांना डॉ. दीपक गोसावी, मंडळाचे पदाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# उद्योजकांकरिता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाच्या विविध कर्ज योजना

कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच, त्याचप्रमाणे सामूहिक विकास प्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. काय आहे ही योजना जाणून घेऊ या लेखातून...

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या आर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरिता रु. एक लक्षची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज नाही) व २५ टक्के बीज भांडवल योजना तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्षपर्यंत), गट कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्ष ते ५० लक्षपर्यंत) या योजनांचा समावेश आहे. सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाकरिता विविध कर्ज योजनांचे रायगड जिल्हा कार्यालयास उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. थेट कर्ज योजना व २५ टक्के बीज भांडवल योजनाचे अर्ज जिल्हा कार्यालयात सशुल्क उपलब्ध आहेत.

रु. एक लक्ष थेट कर्ज योजना : लाभार्थींना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी चार वर्ष आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता रु. २०८५.

२५ टक्के बीज भांडवल योजना :- कर्जाची उच्चतम मर्यादा रु. पाच लक्षपर्यंत. कर्ज परत फेडीचा कालावधी पाच वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५० वर्ष आहे. बँकेमार्फत लाभार्थींना ७५ टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये महामंडळाचा सहभाग २५ टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या रकमेवर व्याजाचा दर चार टक्के असतो.

या योजनांसाठी लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे :- पासपोर्ट साईज दोन फोटो, तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मूळ (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लक्ष), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (विजाभज व वि.म.प्र), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र व शिधापत्रिकेची झेरॉक्स, स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल, रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/जन्मतारखेचा दाखला, भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इ. कागदपत्रे लागतात.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजनेकरिता www.vjnt.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (रु. १० लक्षपर्यंत) :- ही योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने रु. १० लाखापर्यंतच्या मर्यादित कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादित) अर्जदाराच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. या योजनेचा कालावधी पाच वर्ष असेल. योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे, कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. आठ लक्षपर्यंत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणानुसार), कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न बँक खाते असणे अनिवार्य महामंडळाच्या www.vjnt.in (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र दिले जाईल. अर्जदारास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर घ्यावे लागेल.

गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लक्ष ते ५० लक्ष पर्यंत) :- विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गतील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत), LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरीता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल.

कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. आठ लक्षपर्यंत असलेल्या उमेदवारांच्या गटास बँकेकडून १० लक्ष ते ५० लक्षपर्यंत मंजूर उद्योग उभारणीकरिता कर्ज उपलब्ध केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५पर्यंत असावे. सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असावा. परतफेडीचा कालावधी- मंजूर कर्जावर पाच वर्षापर्यंत अथवा कालावधी यापैकी जो कमी असेल तो. कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त १२ टक्के व्याजदराच्या आणि रु.१५ लाखाच्या मर्यादेत) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.vjnt.in (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे गटाचा ऑनलाईन पद्धतीन कर्ज अर्ज भरणे आवश्यक आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र दिले जाईल. गटास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घ्यावे लागेल.

इच्छुक, गरजू विजभज व विमप्र प्रवर्गातील व्यक्तींनी योजनेच्या अधिक माहितीकरिता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या), जिल्हा कार्यालय, श्री राम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्यादित, सदनिका क्र. १, तळमजला, मारुती मंदिरामागे, चेंढरे अलिबाग, जि.रायगड, दूरध्वनी क्र. ०२१४१-२२१३०७, Email - vnvintdcraigadlomail.com येथे संपर्क साधावा तसेच www.vjnt.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा व्यवस्थापक पोपट गिते यांनी कळविलेय.

**-जिल्हा माहिती कार्यालय, अलिबाग**



# टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले होते.शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धे स खेळाडूंचा उत्तम प्रतिसाद लाभला.



स्पर्धेचे बक्षीस वितरण लायन्स क्लबचे डिस्ट्रीक गव्हर्नर एन.आर. परमेश्वरम यांच्या हस्ते झाले. या समारंभास लायन्स क्लबचे विजय गणत्रा व प्रथम प्रांतपाल संजय सुर्यवंशी, उमंग देसाई, विजय पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष एस.जी. चव्हाण, सेक्रेटरी अशोक गिल्डा, खजिनदार मनोज म्हात्रेम प्राजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, मधुकर भगत, मदन गोवारी, गौतम म्हस्के, अलका चव्हाण, भावना जेसवानी, लिओ क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष अंचिता कदम यांच्यासह विविध क्लबचे सदस्य संख्येने उपथित होते.

या वेळी कै. मोरेश्वर पोतदार व कै. मंगला पोतदार यांच्या स्मरणार्थ संजय पोतदार यांच्यातर्फे नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेतील पुरुष व महिला विजेत्यास फिरता चषक देण्यात आला. स्पर्धेत चीफ रेफरी पराग अंकोलेकर व असिस्टंट चीफ रेफरी म्हणून शामल डेब्बार्मा यांनी काम पाहिले.

**गटनिहाय विजेते व उपविजेते**

**नवोदित** : मुली–रिया ठाकूर, किरण हीन्डोनिया, मुले–विठ्ठल शेळके, अर्नव साळावकर; **११ वर्षाखालील** : मुली–ध्रीती अगरवाल, अनया वर्मा, मुले–अश्विक चव्हाण, अर्णव साळावकर, **१३ वर्षाखालील** : मुली–त्रिशा शेखर पावशे, श्रेया अशोक जानकर, मुले–नील राठोड, मंदार राणे; **१५ वर्षाखालील** : मुली–रूद्रा राजेश सरवणकर, त्रिशा शेखर पावशे, मुले–सोहम तावडे, रेयांश शाहू; **१७ वर्षाखालील** : मुली–जिया मेहेरबान नेगी, रूद्रा राजेश सरवणकर, मुले–सोहम तावडे, सिद्धार्थ देशपांडे; **१९ वर्षाखालील** : मुली–सुची रानपारा, साईअंकिता घटक, मुले–रेयांश साहू, देवांश ठक्कर; वरिष्ठ पुरुष :निक्लस दास, शक्ती कुमार; महिला एकेरी : अनिशा पात्रा, संस्कृती शर्मा; पुरष एकेरी : प्रियांकुश बोस, लोकेश पटवा.

# बॉक्सिंग स्पर्धेत 'सीकेटी'च्या श्रावणीची राज्यस्तरावर निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई शहरद्वारा धारावी येथील आयोजित राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुलात नुकत्याच झालेल्या मुंबई विभागीय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत नवीन पनवेल मधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी श्रावणी दिलीप म्हात्रे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी श्रावणीचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ग्रंथा पांगत गोळाफेक स्पर्धेत जिल्ह्यात पहिली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील एचओसी पिल्लई इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर जिल्हास्तरीय विविध स्पर्धा पार पडल्या. यातील गोळाफेक स्पर्धेत सतरा वर्ष गटात मोहोपाडा आळी आंबिवली येथील ग्रंथा मिलिंद पांगत हिने प्रथम क्रमांक पटकावला.



गोळाफेक स्पर्धेत एकूण १८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. यात ग्रंथा हिने सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सुयश संपादन केल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सॉफ्ट टेनिस स्पर्धेत सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी चमकले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माटुंगा येथे झालेल्या मुंबई विभागस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत नवीन पनवेलमधील चांगु काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील आदित्य मुंडे व दीक्षा वलवे (दोघे बारावी विज्ञान) या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांची राज्यस्तरीय टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विभागस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विभागस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा माटुंगा येथील शिशुवन पॅव्हेलियन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स या ठिकाणी झाली. या स्पर्धेतून यशस्वी ३० खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे. स्पर्धेत रायगड, पनवेल महापालिका, नवी मुंबई, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे येथील शाळेतील मुलांनी सहभाग नोंदविला.



१४ वर्षाखालील : मुले–स्पर्श पाटील (रायन इंटरनॅशनल स्कूल), श्लोक साळुंखे (न्यू होरायझन पब्लिक स्कूल, खांदा कॉलनी), प्रकाश गौतम (महात्मा इंटरनॅशनल स्कूल, खांदा कॉलनी), मुली–इरा आयांथन (विश्वज्योत हायस्कूल खारघर), स्वरा शेळके (श्री नारायण गुरू इंटरनॅशनल स्कूल, उलवे), प्रतिक्षा पुरातगिरी (श्री नारायण गुरू इंटरनॅशनल स्कूल, उलवे), आयेशा खान (मायनॉरिटी इंग्लिश स्कूल, पनवेल), काव्या कुमार (रामशेठ ठाकूर स्कूल खारघर); १७ वर्षाखालील : मुले–आकर्ष वाघमारे (सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल), मुली–आर्या लिंगणवाड यश्वि वेद (सेंट मेरीस स्कूल वाशी), प्रतीक्षा वलवे (सेंट जोसेफ स्कूल, नवीन पनवेल), तन्वी माने (डिव ड्रॉप्स स्कूल), निरजा कदम (अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव); १९ वर्षाखालील : मुले–राज शिंदे (सेंट मेरीस स्कूल वाशी), आदित्य मुंढे (सीकेटी कॉलेज पनवेल); मुली–समिक्षा शेरकर (महात्मा ज्युनिअर कॉलेज नवीन पनवेल), दीक्षा वलवे (सीकेटी कॉलेज खांदा कॉलनी).

सर्व यशस्वी खेळाडूंचे रायगड जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर क्रीडा मार्गदर्शक भक्ती तिवारी, सौ मनीषा मानकर व रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशन सचिव स्वप्निल वारंगे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : शारदीय नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे. यानिमित्ताने शिरढोण येथील डीपीएस स्कूलमध्ये गरब्यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी भेट देत देवीचे दर्शन घेतले. गव्हाणमध्ये सुरू असलेल्या नवरात्रोत्सवालाही त्यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले. सोबत अन्य मान्यवर.**



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, भिंगारी, पनवेल

**नवरंग** जांभळा



पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल पिरकोन, उरण



फुंडे हायस्कूल शिक्षिकावृंद, उरण



जीजेएम इंग्लिश मीडियम स्कूल, खालापूर




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com